युगे अठ्ठावीस विटेवरी उभा (विठ्ठलाची आरती)

Yuge Atthavis Vitthal Aarti

Source: Internet Archive (Digital Library of India) — Abhanganchi Gatha of Namdev, ed. Tukaram Tatya, Tattvavivechak Press, Bombay (1894), part 5, leaves 52–53 / printed pages 180–181, abhang 2459 (selected witness). Also compared: Internet Archive — Navanit, Government Central Book Depot, Bombay (1878), leaf 379 / printed page 373, आरती पांडुरंगावरची (three-stanza comparison witness); Internet Archive — Shri Namdev Maharaj (Namdevcharitra), uttarardha, J. R. Ajgaonkar (1927), leaf 199 / printed page 208, item 192 (comparison witness).

VERSE 1

युगें अठ्ठाविस विटेवरी उभा । वामांगें रखुमाई दिसे दिव्य शोभा ॥
पुंडलिका भेटी परब्रह्म आलेंगा । चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ॥ धृ० ॥
जयदेव जयदेव जय पांडुरंगा । रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा ॥ १ ॥

Yuge Atthavis Vitevari Ubha | Vamange Rakhumai Dise Divya Shobha ||
Pundalika Bheti Parabrahma Alenga | Charni Vahe Bhima Uddhari Jaga || Dhru ||
Jaydev Jaydev Jay Panduranga | Rakhumai Vallabha Raichya Vallabha Pave Jivalaga || 1 ||

VERSE 2

तुळसी माळा गळां कर ठेवून कटीं । कासे पीतांबर कस्तुरी लल्लाटी ॥
देव सुरवर नित्य येती भेटीं । गरुड हनुमंत पुढें उभे रहाती ॥ २ ॥

Tulsi Mala Gala Kar Thevun Kati | Kase Pitambar Kasturi Lallati ||
Dev Survar Nitya Yeti Bheti | Garud Hanumant Pudhe Ubhe Rahati || 2 ||

VERSE 3

ओवाळू आरती कुरवंड्या येती । चंद्रभागे माजीं सोडूनिया देती ॥
दिंडी पताका वैष्णव नाचती । पंढरीचा महिमा वर्णूं मी कीती ॥ ३ ॥

Ovalu Aarti Kurvandya Yeti | Chandrabhage Maji Soduniya Deti ||
Dindi Pataka Vaishnav Nachti | Pandharicha Mahima Varnu Mi Kiti || 3 ||

VERSE 4

ओवाळूं आरति अनुछत्रपाळा । सोनियाचीं कमळें पद्माळे तळां ॥
राई रखुमाबाई राणिया सकळां । ओवाळीला राजा विठ्ठल सांवळा ॥ ४ ॥

Ovalu Aarti Anuchhatrapala | Soniyachi Kamale Padmale Tala ||
Rai Rakhumabai Raniya Sakala | Ovalila Raja Vitthal Sanvala || 4 ||

VERSE 5

आषाढी कार्तिकी भक्तजन येती साधुजन येती । चंद्रभागेतीरीं स्नानें जे करिती ॥
दर्शन हेळा मात्रें तया होय मुक्ति । केशवासी नामदेव भावें ओवाळिती ॥ ५ ॥
जय देव जय देव० ॥

Ashadhi Kartiki Bhaktajan Yeti Sadhujan Yeti | Chandrabhagetiri Snane Je Kariti ||
Darshan Hela Matre Taya Hoy Mukti | Keshavasi Namdev Bhave Ovaliti || 5 ||
Jay Dev Jay Dev ||